दैनिक
सकाळ

दि. २६ ऑगस्ट, २०२४



जळगाव : खुल्या जीपमधून रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आगमन झाल्यानंतर त्यांना अभिवादन करताना उत्साही महिला.

# महिला सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या !

पान १ वरून »

मेहनत घेत आहेत. महाराष्ट्रात माता-भगिनींसाठी, शेतकरी, युवक-युवतीसाठी महायुती सरकार नवनवीन योजना आणत असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

## देशाचा कारभार महिलांच्या हाती

प्रत्येक क्षेत्रात नारीशक्तीने आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. सैन्याच्या तीनही दलांमध्ये महिला वरिष्ठ पदांवर आहेत. आता महिलांच्या हाती ड्रोन असून, त्या आधुनिक शेती करताय, शेतकऱ्यांना मदत करताय. गावागावांत पशुसखी नेमून दोन लाख महिलांना त्यासंबंधी प्रशिक्षण दिले जातेय. कृषी सखी कार्यक्रमाद्वारे महिला आता शेतकऱ्यांना मदत करतील. येणाऱ्या काळात देशाचा कारभारही महिलांच्या हाती सोपविण्यात येईल, असे मोदी म्हणाले.

महाराष्ट्राचा पोलंडमध्ये गौरव

महाराष्ट्राच्या गौरवशाली संस्कार, संस्कृतीचे दर्शन विदेशातही होत आहे. पोलंड (युरोप)मध्ये महाराष्ट्रीय नागरिकांनी महाराष्ट्रातील संस्कृती दर्शन घडविले. पोलंडचे नागरिक महाराष्ट्राच्या नागरिकांचा सन्मान करतात. दुसऱ्या जागतिक युद्धाच्या वेळी पोलंडमधील निर्वासितांना कोल्हापूरमधील राजघराण्यांनी आश्रय दिला होता, त्याचा सन्मान म्हणून पोलंडच्या नागरिकांनी त्यांच्या राजधानीत कोल्हापूर मेमोरियल उभारले असून, ते पाहून गर्वाने आपली छाती मोठी झाल्याचा अनुभव त्यांनी सांगितला.

## संत मुक्ताई, बहिणाबाईंचा गौरव

जळगाव वारकरी परंपरेचे तीर्थ आहे. संत मुक्ताईची भूमी आहे. त्यांची साधना आजच्या पिढीला प्रेरणा देत आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरींच्या कविता संसाराचे सार सांगतात. ते आजच्या समाजाला मार्गदर्शक ठरताहेत.

## महिलांसाठी तीन लाख कोटींचे बजेट

मातृशक्तीवर, त्यांच्या कर्तृत्वावर माझा विश्वास आहे. मातांनी कर्ज घेतले आणि परतही केले. मुद्रा कर्जाची मर्यादा आता ३० लाखांपर्यंत करण्यात आली आहे. २०१४ पर्यंत २५ हजार कोटींपेक्षा कमी बँक कर्ज महिलांना दिले गेले. मी दहा वर्षांत नऊ लाख कोटींचे कर्ज दिले. केंद्र सरकारने महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व आत्मनिर्भर करण्यासाठीचे बजेट तीन लाख कोटींवर नेल्याचा दावाही त्यांनी केला.

## या मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमासाठी राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ, आमदार संजय सावकारे, सुरेश भोळे, किशोर पाटील, मंगेश चव्हाण, आमदार लता सोनवणे आदी उपस्थित होती. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रेय कराळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आदी उपस्थित होते.

दैनिक
सकाळ

दि. २६ ऑगस्ट, २०२४



जळगाव : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला. पंतप्रधानांशी बोलण्याची संधी मिळाल्याने मनमोकळेपणाने भावना व्यक्त करताना महिला.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा लखपती दीदींशी संवाद

## आर्थिक सक्षमता मिळाल्याची दीदींची भावना

**सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. २५ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (ता. २५) येथे देशातील निवडक लखपती दीदींशी संवाद साधला. लखपती दीदी योजनेमुळे त्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलाविषयी मोदी यांनी संवादाच्या माध्यमातून जाणून घेतले.

'लखपती दीदी योजने'मुळे महिला बचत गटांना मिळालेल्या आर्थिक, व्यावसायिक सहाय्य व प्रशिक्षणामुळे आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम झालो. त्याचबरोबर आम्हाला आत्मसन्मानही मिळाला, अशी भावना लखपती दीदींनी या वेळी व्यक्त केली.

येथील प्राइम इंडस्ट्रिअल पार्क मैदानावर झालेल्या लखपती दीदी संमेलनापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील निवडक अशा ८० लखपती दीदींशी संवाद साधला. या लखपती दीदी संवाद कार्यक्रमात देशातील वेगवेगळ्या राज्यातील बँक सखी दीदी, ड्रोन दीदी, पशु सखी, कृषी दीदी म्हणून नावारूपाला येऊन लखपती झालेल्या महिला उपस्थित होत्या.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे ग्रामविकास, पंचायतराज व पर्यटनमंत्री गिरीश महाजन आदी उपस्थित होते.

दैनिक
# सकाळ

## दि. २६ ऑगस्ट, २०२४



जळगाव : प्रतीक्षागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रतीक्षेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार. शेजारी पालकमंत्री गुलाबराव पाटील, माजी खासदार डॉ उल्हास पाटील, आमदार जयकुमार रावल आदी.



जळगाव : पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वागत करताना राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक. सोबत मंत्री अनिल पाटील व अधिकारी.



जळगाव : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत करताना पालकमंत्री गुलाबराव पाटील. शेजारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.



जळगाव : हजारो महिलांना अभिवादन करीत खुल्या जीपमधून येताना पंतप्रधान नरेंद्र मोदी. शेजारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी.

### खुल्या जीपमधून अभिवादन

▪ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कार्यक्रमस्थळी उघड्या जीपमधून आगमन झाले. या वेळी त्यांनी उपस्थित हजारो भगिनींना अभिवादन केले आणि त्यांच्या शुभेच्छांचा स्वीकार केला. कार्यक्रमस्थळी उभारलेल्या मंडपामधून पंतप्रधान मोदी यांनी फेरी मारली. या वेळी उत्साहाने भारलेल्या वातावरणात उपस्थित भगिनींनी त्यांचे स्वागत केले. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार त्यांच्याबरोबर होते.


दैनिक
सकाळ

**दि. २६ ऑगस्ट, २०२४**

# महाराष्ट्रात ५० लाख लखपती दीदी करणार

## एकनाथ शिंदे : पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीचा संकल्प

■ सकाळ वृत्तसेवा



**जळगाव, ता. २५ : देशाच्या तीन कोटी लखपती दीदी बनविण्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठा असेल. देशातील तीन कोटी दीदींमध्ये राज्यातील ५० लाख दीदींचा समावेश राहील. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानातून पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.**

जळगावातील प्राइम इंडस्ट्रिअल पार्कवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रविवारी (ता. २५) झालेल्या 'लखपती दीदी' संमेलनात ते बोलत होते. राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत एक कोटी महिलांच्या खात्यात दोन हप्ते जमा करण्यात आले. अन्नपूर्णा योजनेंतर्गत तीन गॅस सिलिंडर देण्याची योजना सुरू केली. मुलींना उच्चशिक्षण मोफत, महिलांना प्रवासात सवलत या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचे काम राज्य शासन करीत आहे.

### राज्यात ३० कोटींची कर्जे

अनेक भगिनी पुढाकार घेऊन छोटे-छोटे उद्योग करून कुटुंबाला पुढे नेत आहेत. राज्यात २५ हजार स्वयंसहाय्यता गटांना ३० कोटींची कर्जे देण्यात आली आहेत. त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जात असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले.


### केंद्राची राज्याला मदत

देशाला महाशक्ती बनविण्यासाठी महिलांची भागीदारी आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र सरकारचे सहकार्य मिळत आहे. केंद्र सरकारने ७६ हजार कोटींच्या वाढवण बंदर विकासाला सहाय्य केले. मेट्रो प्रकल्पाला मदत केली. राज्यातील कांदा, कपाशी, दूध, सोयाबीन यांना चांगला दर मिळावा यासाठी आणि सिंचन प्रकल्पांना निश्चितपणे मदत करेल, असा विश्वासही मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

### नेपाळमधील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख


नेपाळमध्ये झालेली दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आहे. राज्य सरकार अपघातातील मृतांसह जखमींच्या दुःखात सहभागी आहे. दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपये राज्य सरकार देईल, अशी घोषणा शिंदे यांनी केली.

### महिलांना सक्षम करणारी योजना : चौहान



■ लखपती दीदी ही महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करणारी आणि विकासाला वेग देणारी अशी योजना आहे. महिलांना त्यांच्या व्यवसायासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून त्यांना स्वावलंबी करण्याचा हा प्रयत्न असल्याचे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले. भरपावसात एवढ्या मोठ्या संख्येने महिलांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावल्याबद्दल त्यांनी सर्व भगिनींचे आभार मानले. महाराष्ट्रात ११ लाख लखपती दीदी झाल्या आहेत. त्यांनी इतरांना प्रेरित करावे, असेही त्यांनी नमूद केले.

### आपल्याबरोबर इतरांनाही लखपती करा : पवार




■ संपूर्ण देशात सुरू असलेला विकासाचा रथ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने जळगाव जिल्ह्यात आला आहे. केळी व कांदा उत्पादनासाठी जळगाव जिल्हा प्रसिद्ध आहे. पंतप्रधान मोदी यांनी तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनविण्याचा संकल्प केला आहे. राज्यात ५० लाख लखपती दीदी बनविण्यात येणार आहे, त्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले. राज्य शासनाचे प्राधान्य नेहमीच महिलांना सज्ज, सक्षम आणि सुरक्षित बनविण्याचे राहिले आहे. राज्य शासन नेहमीच महिलांच्या पाठीशी राहील, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला.

# 'नार-पार'ची निविदा लवकरच

## फडणवीस : लखपती दीदी संमेलनात घोषणा

■ सकाळ वृत्तसेवा



जळगाव, ता. २५ : जळगाव जिल्ह्यासह खानदेश सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या नार-पार गिरणा सिंचन योजनेला आपण गती दिली. केंद्र सरकारनेही त्यास मंजुरी दिली असून, या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेस राज्य मंत्रिमंडळात मान्यता देण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रविवारी (ता. २५) जळगावात झालेल्या लखपती दीदी संमेलनात ते बोलत होते. संत मुक्ताई आणि कवयित्री बहिणाबाई यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. अशा ठिकाणी हे लखपती दीदींचे संमेलन होत आहे. राज्यात बचत गटामार्फत ७५ लाख कुटुंबे जोडली गेली असून, दोन कोटी कुटुंब जोडण्याचा संकल्प आपण केल्याचे ते म्हणाले.

### 'लखपती दीदीं'चा पंतप्रधानांकडून सन्मान

■ आजच्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील वंदना पाटील, मनीषा जगताप, ज्योती तागडे, सीमा कांबळे, रमा ठाकूर यांच्यासह शीतल नारंग (हिमाचल प्रदेश), मेहबूबा अख्तर (जम्मू-काश्मीर), गंगा अहिरवार (मध्य प्रदेश), एस. कृष्णावेणी (तेलंगण) आणि नीरज देवी (उत्तर प्रदेश), सेरिंग डोलकर (लडाख) यांना पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते लखपती दीदी झाल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात आले. या वेळी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते बचत गटाच्या ४८ लाख महिलांना दोन हजार ५०० कोटी रुपयांच्या फिरत्या निधीचे वितरण करण्यात आले.



जळगाव : लखपती दीदी म्हणून पात्र ठरलेल्या यशस्वी महिलांना प्रमाणपत्र देऊन सन्मान करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी. शेजारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी.

महिला विकासाच्या प्रवाहात आल्यास देशात प्रभावी आणि विकासात्मक बदल घडू शकतो. त्यामुळेच विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या नारीशक्तीच्या आर्थिक बळकटीकरणासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.